# दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती नोटीस

## केंद्र शासनाची दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना
## सन २०२४-२५
## कनिष्ठ व वरीष्ठ विभाग

केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकरीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांजन विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२५ साठी राज्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.

## सर्व नविन व नुतनीकरण विद्यार्थ्यांनी

**ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसाठी विद्यार्थ्यांने आधार क्रमांक नमुद करुन अर्ज खालील वेबसाईटवर भरावे :-**

**www.scholarships.gov.in**

## ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसाठी अंतिम दिनांक ३०/०९/२०२४ अखेर.

पात्रता:-

**सदर शिष्यवृत्ती ११वी,१२वी, पोस्ट मॅट्रीक डिप्लोमा/सटिफिकेट पदवी, पदव्युत्तर डीग्री/ डिप्लोमा तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते.**

**किमान पात्रता,अटी व कागदपत्रे:-**

१. अपंगत्व टक्केवारी ४० टक्के किंवा त्यापुढील असावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र.

२. मागील वार्षिक परीक्षेत उतीर्ण झालेला असावा.

३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती व स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

४. एकाच कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल(जर दुसरे व तिसरे अपत्य जुळे असतील तर सदर योजनेचा लाभ घेता येईल.)

५. विद्यार्थी आधार आयडी (UDID) असने व तसेच विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे(**Operative / Active Mode**) आवश्यक आहे. शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेसाठी विद्यार्थ्याचा आधार आधारीत बायोमेट्रीक प्रमाणीकरण केल्याने शिष्यवृत्ती रक्कम जमा करणे सुलभ होईल.

६. विद्यार्थ्याचा अर्ज भरण्यासाठी दिव्यांगजन असल्याचे ओळखपत्र (UDID) असणे आवश्यक आहे.

७. ऑनलाईन अर्ज भरताना फोटो, वयाचा पुरावा, अपंगत्व प्रमाणपत्र, वडीलांचे(वडील नसल्यास आईचे) तहसिलदारांचे उपत्पन्नाचा दाखला, चालू प्रवेशाची ॲडमिशन पावती, मागील वर्षाचे गुणपत्रक इ. ऑनलाईनमध्ये ओरीजन कागदपत्रे अपलोड करावे.

८. ऑनलाईन भरलेला शिष्यवृत्ती फॉर्म व अपलोड केलेल्या कागदपत्रे जोडून कॉलेजमध्ये पुढील कार्यवाहीसाठी जमा करणे बंधनकारक आहे.

९. विद्यार्थ्याचा रहिवासी दाखला तहसिलदारांचा असणे आवश्यक आहे.

१०. जर विद्यार्थी एका राज्याचा कायमचा रहिवासी असेल परंतू दुसऱ्या राज्यात शिकत असेल तर, विद्यार्थ्यांने त्या राज्याच्या शिक्षण/कल्याण विभागाची कायम रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. एखाद्या विद्यार्थ्यांने खोटया कागदपत्राद्धारे शिष्यवृत्ती मिळवल्यास शिष्यवृत्तीची रक्कम अपंग व्यक्तीच्या समक्षीकरण विभाग, सरकारच्या निर्णयानुसार वसुल केली जाईल व विद्यार्थ्यास काळया यादीत टाकून शिष्यवृत्तीपासून कायमचे वंचित केले जाईल.

१२. विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती दिली आहे व विद्यार्थ्यांने अभ्यासक्रम बदल्यास त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल व शिष्यवृत्ती रक्कम व सर्व भत्ते वसुल केली जाईल.

१३. विद्यार्थी जर एकाच वेळी दोन अभ्यासक्रमध्ये शिक्षण घेत असेल तर कोणताही एकच अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.

प्राचार्य,
मिरज महाविद्यालय,मिरज.